# राष्ट्रपुरुष
# छत्रपती शिवराय

द. बा. ठेंगडी

रायगड उत्सव : १९७९

# निवेदन

प्रतिवर्षी चैत्री पौर्णिमेला रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांची पुण्यतिथी साजरी केली जाते. या कार्यक्रमानिमित्त गडावर शिवभक्तांची संख्या मोठ्या प्रमाणावर उपस्थित असते. अनेक मान्यवर भारतीय नेते या कार्यक्रमात सहभागी झालेले असून त्यांनी मुक्तकंठाने शिवप्रभूंच्या चिरप्रेरक कार्याचे ऋण मान्य केले आहे.

या वर्षीचा कार्यक्रम दि. १२ एप्रिल १९७९ या दिवशी झाला; त्यावेळी श्री. दत्तोपंत ठेंगडी यांचे प्रमुख भाषण झाले. छत्रपतींच्या कार्याचे त्यांनी केलेले विश्लेषण अत्यंत मार्गदर्शक असल्यामुळे ते प्रकाशित करीत आहोत.

गेली अनेक वर्षे या प्रकारच्या समारंभात उपस्थित राहून तो सर्वदृष्टचा सुव्यवस्थित पार पडावा म्हणून प्रयत्नशील असणारे रा. स्व. संघाचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. मोरोपंत पिंगळे यांनी या उत्सवप्रसंगी व्यक्त केलेले विचार सारांशरूपाने या पुस्तिकेत समाविष्ट केले आहेत.

आमच्या अन्य प्रकाशनांप्रमाणेच ही पुस्तिकाही वाचकांना आवडेल हा विश्वास वाटतो.

प्रकाशक

रवींद्र र. महाजन
दि. १४-१-८३, पुणे

# राष्ट्रपुरुष छत्रपती शिवराय

" मुक्या मनाने किति अुधळावे शब्दांचे बुडबुडे ।
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ॥ "

शाहीर गोविंदांच्या या पंक्ती मी हायस्कूलमध्ये शिकत असताना वाचल्या होत्या. आज ज्यांचे पुण्यस्मरण करावयाचे आहे तो कृतिवीर होता आणि त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त भाषण करणारा मीं वाचीवीर. अशा प्रकारचा आजचा हा विषम प्रसंग. थोर पुरुषाला समजणारे त्याचे समकालीनही कमी असतात. कालांतराने त्यांना समजणे हे आणखी कठीण होते. म्हणून म्हटले आहे की,

' स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधी जन्मती ।'

थोर पुरुषांची थोरवी आकलन होण्यासाठीही मनुष्याची काही उंची असावी लागते. ती नसलेल्या माणसाला आजचा हा समारोह बोलण्याकरिता प्राप्त होतो आहे, हा जरा एक बेजोड असा प्रसंग आहे.

शिवाजी महाराजांविषयी महाराष्ट्रातील लोकांना कुणी काही सांगावे, याची खरोखरी आवश्यकता नाही. इथल्या आबालवृद्धाला त्यांच्याविषयी माहिती आहे. त्यांच्या चरित्रातील घटना, त्यापासून प्राप्त होणारी स्फूर्ती, मार्गदर्शन, या सगळ्यांचा लाभ आणि अनुभव महाराष्ट्रातील सर्व लहानमोठ्या समजदार माणसांनी घेतलेला आहे. तेव्हा त्यांच्या चरित्राविषयी, त्यांनी केलेल्या कार्याविषयी मी काही सांगावे तर त्यामध्ये धृष्टता तर होणार नाही ना, असे वाटते. परंतु इतिहासाविषयी सखोल ज्ञान नसतानासुद्धा जे काही थोडेसे वरवर वाचण्याचा प्रसंग येतो, त्यांच्याविषयीची माहिती करून घेण्याचा प्रसंग येतो, त्यावरून काही गोष्टी ध्यानात येतात.

मध्यंतरी एक गोष्ट ध्यानात आली. मनुष्य जन्माला आला की त्याची कुंडली तयार करतात. या कुंडलीमध्ये– जन्मपत्रिकेमध्ये–जी काही ग्रहस्थिती असेल त्या ग्रहस्थितीला धरून त्या व्यक्तीच्या जीवनात आयुष्यभर घटना घडतात, असे ऐकत होतो. पूर्वी माझा असा समज होता की, कुंडलीचा परिणाम हा मनुष्य जिवंत असेपर्यंतच राहतो. पण शिवाजी महाराजांच्या उदाहरणावरून असे लक्षात आले

की, मृत्यूनंतर देखील हे शनि-मंगळ आपला प्रभाव गाजवीत असतात; कारण असे की, महाराज होऊन गेले, जे कार्य करावयाचे ते त्यांनी केले. परंतु त्यांच्याविषयी, लोकांची प्रतिक्रिया ही निरनिराळ्या कालखंडात, निरनिराळ्या लोकांची, निरनिराळ्या प्रकारची राहात आली आणि त्यांना मृत्यूनंतरही चढ आणि उतार पाहावे लागले, असे दिसते.

## पहिला समारंभ

आपल्याला माहिती आहे की, शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर म्हणजे १६८० नंतर व संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर म्हणजे १६८९ नंतर जवळजवळ १८ वर्षे केंद्रसरकारविरहित अशा प्रकारची हिंदूंची स्थिती महाराष्ट्रात असताना, सर्व प्रकारच्या साधनांचा अभाव असताना आणि एका प्रबळ साम्राज्याचा अधिपती आपल्या दलबलासहित दक्षिणेत ठाण मांडून बसला असताना त्याचा प्रतिकार करण्याचा प्रसंग येथल्या हिंदूंवर आला होता. आणि असे दिसते की, त्यावेळी शिवाजी महाराजांचे ग्रह फार उच्च प्रतीचे असले पाहिजेत. कारण तशा अत्यंत विरोधी, प्रतिकूल परिस्थितीत, महाराजांची प्रेरणा, त्यांचे विचार, त्यांचे आदर्श उराशी बाळगून जिवाचे रान करणारे, आत्मबलिदान करणारे, सतत शत्रूचा प्रतिकार करणारे हजारो वीरपुरुष त्यावेळी पुढे आले आणि जगाच्या इतिहासामधील एक अद्‌भुत असा प्रतिकाराचा अध्याय त्यांनी आपल्या रक्ताच्या शाईने लिहिला. त्या पुढील कालखंडात हे हिंदूंचे राज्य-स्वराज्य-स्थापन झाले, वाढले, अगदी अटकेपर्यंत झेंडे गेले, परंतु प्रारंभी जी आदर्शवादिता होती, जे ध्येय होते, जे शिवाजी महाराजांचे स्वप्न होते, ते लोकांच्या मनासमोर अस्पष्ट व्हावयास लागले. ज्या चारित्र्यामुळे, ज्या गुणसमुच्चयामुळे, ज्या ध्येयवादामुळे महाराजांनी शून्यातून सृष्टी निर्माण केली होती, ते सर्व मलीन व्हावयाला लागले. जेथे एकीकडे महाराजांनी शून्यातून सृष्टी निर्माण केली, तिथे दुसरीकडे त्यांच्याच वंशजांवर, वैचारिक व राजकीय वंशजांवर, असलेली सृष्टी पुन्हा शून्यात विलीन करण्याचा प्रसंग आला. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या वेळी प्रमुख सेनापतीच्या मनाला शिवाजी महाराजांची प्रेरणा जागृती देत होती, अशा प्रकारचा स्पष्ट उल्लेख आपल्याला इतिहासात आढळतो. त्यानंतरही स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतिकारकांचे जे प्रयत्न झाले, त्यांनाही शिवाजीची फार मोठी प्रेरणा होती. लोकमान्य टिळकांनी शिवाजीचा उत्सव 'एक राष्ट्रीय उत्सव' या स्वरूपात करण्याचे ठरविले आणि रेकॉर्डवरून असे दिसते की, १५ मार्च १८९५ ला प्रथम रायगड येथे एक पहिला साधा असा समारंभ झाला. त्याच वर्षी कॉंग्रेसच्या अधिवेशनप्रसंगी पुण्याला शिवाजी महाराजांच्या उत्सवाविषयी विचार करण्यासाठी एक बैठक झाली आणि हा उपक्रम सुरू झाला.

## परकीयांचा विरोध

हा उपक्रम सुरू झाल्यानंतर, अगोदर मी म्हटल्याप्रमाणे, शिवाजीमहाराजांच्या कुंडलीतील ग्रहयोगाचा परिणाम दिसावयाला लागला राष्ट्रीय वीरपुरुषाचा उत्सव साजरा करणे ही काही जगात नवीन गोष्ट नाही. परंतु शिवाजी महाराजांचा हा उत्सव सुरू झाला तेव्हा त्याविषयी जनता आणि त्याहिपेक्षा परकीय सरकार साशंक दृष्टीने पाहावयाला लागले. हा उत्सव विफल व्हावा म्हणून इंग्रज सरकार आणि त्यांचें हस्तक असलेली इंग्रजी वर्तमानपत्रे यांनी त्याविरुद्ध प्रचार सुरू केला. त्यांच्या मनात आशंका निर्माण व्हावी अशीही स्थिती त्यावेळी होती. असे दिसते की, १८९७ मध्ये १२ जूनला पुण्यात शिवाजी उत्सव साजरा झाला, त्या उत्सवामध्ये ' अफझलखानाचा वध ' ' त्याचे समर्थन ' अशा प्रकारची एकदोन भाषणे झाली आणि योगायोग म्हणा, काकतालीय न्याय ( co- incidence ) म्हणा अथवा न म्हणा, त्या उत्सवानंतर दहा दिवसांच्या आत आधुनिक इतिहासातील पहिली राजकीय हत्या पुण्याला घडली. कदाचित् हा योगायोग असेल, कदाचित् नसेल. पण अशा प्रकारच्या घटनांमुळे आणि या उत्सवाचे प्रेरक लोकमान्य टिळक असल्यामुळे सरकारच्या मनामध्ये शंका उत्पन्न होणे स्वाभाविक होते. त्यामुळे शिवाजी, शिवाजीचे कार्य, शिवाजीचे व्यक्तिमत्व यांवर शितोडे उडविण्याचा कार्यक्रम सुरू झाला. इंग्रजी वर्तमानपत्रांनी दोन गोष्टींवर विशेष भर दिला : (१) शिवाजी हे अखिल भारतीय व्यक्तिमत्व नाही, केवळ महाराष्ट्रापुरते संकुचित अशा प्रकारचे हे व्यक्तिमत्व आहे. (२) हे केवळ हिंदुसंप्रदायाचे नेतृत्व आहे. हिंदू, मुसलमान आणि इतर यांच्यांत नेहमी संघर्ष होत राहिला आहे. त्याअर्थी या सर्वांचा राष्ट्रपुरुष, या नात्याने शिवाजीची गणती होऊ शकत नाही. शिवाजी संबंधात हे दोन आक्षेप प्रारंभिक काळात घेण्यात आले.

## अपप्रचाराला अपयश

या आक्षेपांना उत्तर देताना ' मराठा ' मधील अग्रलेखात लोकमान्य टिळकांनी असे म्हटले आहे की, जरी या कार्याचा प्रारंभ स्वाभाविक रूपाने महाराष्ट्रात झाला असला तरी पण शिवाजींची दृष्टी अखिल भारतीय होती. संपूर्ण राष्ट्र व त्या राष्ट्राविषयीची भक्ती ही शिवरायांची दृष्टी होती आणि ही दृष्टी महाराष्ट्राबाहेरच्या व्यक्तींनीही मान्य केली आहे. महाराजांच्या व्यक्तिमत्वाला महाराष्ट्रापुरते सीमित ठेवण्याचा प्रयत्न सरकारने कितीही केला असला तरी त्यात सरकारला यश मिळाले नाही, ही गोष्ट खरी आहे. निरनिराळ्या प्रांतांमधून ' हा आपला राष्ट्रीय पुरुष आहे. ' या भावनेने, शिवाजीविषयी विचार सुरू झाले, लिखाण सुरू झाले, नाटक, कादंबऱ्या, काव्य इत्यादि लिहिण्याची प्रक्रिया सुरू

झाली. मराठी भाषेबाहेर महाराजांचे पहिले चरित्र ( बायोग्राफी ) उर्दूमध्ये लाला लजपतराय यांनी लिहिले आणि त्यानंतर बहुतेक सर्व भाषांमध्ये राष्ट्राला प्रेरणा देणे, गलितधैर्य लोकांचे मनोधैर्य– आत्मविश्वास जागृत करणे या हेतूने देशभक्त लोकांनी शिवाजीविषयक साहित्यनिर्मिती सुरू केली. इंग्रजांनी आपल्या सर्व साधनांनिशी उलटा प्रचार चालविला होता. उदाहरणार्थ, गुजरातमध्ये असा प्रचार केला की, शिवाजीने सुरत लुटली, गुजराती लोकांना लुटले, कर्नाटकमध्ये बसरूरचे बंदर लुटले, कर्नाटकच्या लोकांना त्रास दिला, ओरीसा आणि बंगालमध्ये प्रचार केला की, 'शिवाजीच्याच वंशजांनी येथे येऊन लुटमार केली.' असा निरनिराळ्या प्रकारे लोकांना भडकवण्याचा प्रयत्न झाला, परंतु आनंदाची गोष्ट ही की, या अपप्रचाराचा परिणाम झाला नाही. उलट त्या काळी निर्माण झालेल्या गुजराती साहित्यात, कर्नाटक साहित्यात ' राष्ट्रपुरुष ' म्हणून महाराजांचा उल्लेख गौरवान करण्यात आला. गुजराती लेखकांनी लिहिले की, सुरत लुटण्यात आली यामध्ये महाराजांचे आक्रमण गुजरातवर नव्हते, औरंगजेबावर होते. कानडी लेखकांनी लिहिले की, बसरूर बंदरावरील आक्रमण हे कर्नाटकावरील नसून पोर्तुगीजांवरील आक्रमण होते. शिवाजीविषयी असे स्फूर्तिप्रद साहित्य महाराष्ट्राजवळीलच नव्हे तर सर्व प्रांतांत निर्माण झाले होते. शिवाजीच्या राज्याभिषेकासंबंधीचे रवीन्द्रनाथ टागोर यांचे गीत प्रसिद्धच आहे. पण अगदी आसाम, ओरिसा, केरळ, तामिळनाडू या सर्व प्रदेशांत शिवाजीला राष्ट्रपुरुष म्हणून मान्यता देणारे साहित्य निर्माण झाले आणि इंग्रजांचा हा प्रचार असफल झाला.

## परकीय आक्रमणाचा प्रतिकार

शिवाजी हे व्यक्तिमत्व हिंदूंपुरते सीमित होते, असा जो इंग्रजांनी दुसरा अपप्रचार केला होता, त्याला उत्तर देताना लोकमान्य टिळकांनी ' मराठा ' मध्ये-लिहिले आहे की, आम्ही हा जो शिवाजी उत्सव करीत आहोत त्यामध्ये शिवाजी हा राष्ट्रपुरुष आहे ही भावना आहे. शिवाजीच्या काळी आक्रमक मुसलमान होते, म्हणून शिवरायांना मुसलमानांचा प्रतिकार करावयाचा होता, ही गोष्ट तर खरीच आहे. मुसलमानांविरुद्ध लढून त्यांना स्वराज्य स्थापावयाचे होते. परंतु यामध्ये हिंदू–मुसलमान हा प्रश्न नव्हता. तर अन्यायाचा प्रतिकार, स्वराज्याची स्थापना ही भावना होती. आज राज्य ना हिंदूंजवळ आहे, ना मुसलमानांजवळ आहे. हिंदू व मुसलमान हे दोघेही परकीय आक्रमणाचे शिकार झालेले आहेत. तेव्हा अशा स्थितीत साऱ्यांनी मिळून या परकीय आक्रमणाचा प्रतिकार करावयाचा आहे. हे आपले कार्य आहे. आणि या दृष्टीने हिंदू–मुसलमान वगैरे भावना मनामध्ये रुजविण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे तो Divide and Rule या धोरणाला

धरून आहे. वास्तविक जो जो अन्यायाचा प्रतिकार करील आणि या राष्ट्रात स्वराज्य स्थापन व्हावे म्हणून प्रयत्न करील तो तो आमचा राष्ट्रपुरुष आहे. मग तो कोणत्याही धर्माचा असो वा कोणत्याही जातीचा असो. ही एक स्पष्ट कल्पना टिळकांनी दिली आणि त्याला उदाहरण म्हणून इतिहास वाचताना कोणती दृष्टी ठेवावी यासाठी एक पुसटसा–ओझरता–उल्लेख त्यांनी केला की, इतिहास जसा आहे, तसाच सांगितला पाहिजे; त्यामध्ये आजच्या राजकीय व इतर आवश्यकता लक्षात घेऊन फेरबदल करणे हे काही बरोबर नाही. परंतु इतिहासकालात काही घटना झाल्या म्हणून चिरकाल त्या भावना तशाच कायम ठेवाव्यात असेही नाही. यासाठी टिळकांनी इंग्लंड आणि स्कॉटलंड संबंधाचे उदाहरण दिले. भूतकालात या दोन देशांत फारच भीषण असे संघर्ष झाले. पण हे दोन्ही देश जेव्हा एकत्र आले तेव्हा भूतकालीन संघर्षमय इतिहासाला मुरड घालावी अशी आवश्यकता त्यांना वाटली नाही. तो इतिहास जसाच्या तसा कायम ठेवण्यात आला. आता इंग्लंड आणि स्कॉटलंड मिळून ग्रेट ब्रिटन झाले आहे, ही गोष्ट सर्वांच्या मनावर बिंबविण्यात आली आणि ग्रेट ब्रिटन म्हणून आपले एक राष्ट्रीयत्व आहे, ही गोष्ट सर्वांनी स्वीकारली. लोकमान्यांनी दुसरे उदाहरण फ्रेंच आणि इंग्रज यांच्यामधील संघर्षाचे दिले. फ्रेंचांनी नेपोलियनचा एखादा उत्सव साजरा केल्यामुळे इंग्रज जर रागावले तर ते उचित होईल काय ? किंवा नेल्सनचा उत्सव इंग्रजांनी केल्यामुळे फ्रेंच चिडले तर ते योग्य होईल काय ? असे प्रश्न टिळकांनी उपस्थित केले ! अशा प्रकारे इंग्रजांच्याकडून शिवाजी महाराजांचे स्वरूप अखिल भारतीय म्हणून प्रस्थापित होऊ नये यासाठी केलेल्या अपप्रचाराला आपोआप उत्तर मिळत गेले तरी अपप्रचार फार जोरात झाला, हा एक ग्रहयोगाचाच परिणाम मानला पाहिजे.

## परदेशांतही उत्सव

१९०५ साली वंगभंगाची चळवळ झाली. लाल, बाल आणि पाल ही त्रिमूर्ती प्रसिद्ध होती. पंजाब, महाराष्ट्र, आणि बंगाल या तीनही प्रांतांकडे राष्ट्रीय चळवळीचे अग्रेसरत्व होते वंगभंगाच्या वेळेला बंगालमध्ये शिवाजी उत्सव फार मोठ्या प्रमाणावर झाला. त्याची वर्णनेही मिळतात. इतकेच नव्हे तर त्यावर्षी हिंदुस्थानाच्या बाहेर, जिथे जिथे भारतीय होते तिथे तिथे हा उत्सव झाला असावा असे दिसते; कारण टोकिओ आणि लंडन येथे झालेल्या उत्सवांची वर्णनेही आज उपलब्ध आहेत. इतरत्रही उत्सव झाल्याचे उल्लेख आहेत. टिळकांच्या मृत्यूनंतर या उपक्रमाला थोडीबहुत शिथिलता आली. मंगळ थोडासा वक्री गेल्यासारखे दिसले. मधल्या काळात महाराजांचे धोरण, त्यांचे सिद्धांत, त्यांचे आदर्श याविषयी जनमानसातील आस्था त्यावेळच्या वातावरणामुळे थोडी कमी झाली, हिंदु–मुसलमान

यांमधील तंग वातावरणामुळे शिवाजी महाराजांच्या कार्यावर प्रहार करण्याची इच्छासुद्धा काहींना झाली. १९२७ साली त्यांच्या जन्माची त्रिशतसांवत्सरी करण्यात आली होती. ऐतिहासिक तिथीसंबंधात इतिहाससंशोधकांच्यामध्ये नेहमीच वाद असतात. ते नसतील तरच नवल! परंतु १९२७ ला झालेल्या या उत्सवाच्या निमित्ताने दिल्लीच्या 'पेशवा' या उर्दू पत्रामध्ये 'निजाम' या नावाच्या व्यक्तीने महाराजांविषयी अत्यंत घाणेरडा मजकूर लिहिला होता. त्याचा सर्वांनी प्रतिवाद केला आणि त्या सर्व अपप्रचाराला बंद पाडण्यात आले. एकंदर ग्रह वक्री गेले म्हणजे काय होते, याची ही थोडीशी चुणूक १९२७ मध्ये आपणास दिसली.

## देशभक्तांचे प्रेरणास्थान

त्यानंतरच्या काळात तर हा ग्रह आणखी वक्री होत गेला असे दिसते. तत्कालीन राजकीय आवश्यकता लक्षात घेऊन एकूण राष्ट्रवादी भूमिका थोडी मवाळ ( डायल्यूट ) करण्याची प्रवृत्ती उत्पन्न झाली. शिवाजी महाराज श्रेष्ठ असूनही, देशभक्त असूनही त्यांना 'पथभ्रष्ट देशभक्त' 'बहकलेला देशभक्त' म्हणण्याचे धाष्टर्य काही मंडळींनी केले. तेव्हा असे वाटते की, त्यांच्या कुंडलीतील गुरु त्यावेळी प्रबळ नसावा. मंगळ वक्री गेला असावा. १९३६, ३७, ३८ मधील वातावरण एकूण अशा प्रकारचे होते असे दिसते. परंतु दुसरीकडे १९२५ साली संघाची स्थापना झाली होती. संघसंस्थापक परमपूजनीय डॉक्टर हेडगेवार यांना प्रेरणादायक व्यक्तिमत्वांमध्ये महाराजांचेही एक व्यक्तिमत्व होते. परंतु नेहमी-प्रमाणे त्यावेळीही संघाचे कार्य प्रसिद्धिपराङ्मुख असल्याने त्याची दखल त्यावेळी फारशी घेण्यात आली नाही. पण संघाच्या या प्रचंड उद्योगाला ज्या काही थोड्या व्यक्ती प्रेरक असतील त्यांत शिवाजी महाराज होते, ही गोष्ट इतिहासात नमूद करावी लागेल.

द्वितीय महायुद्धाच्या वेळेला भारतीय स्वातंत्र्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी प्रचंड कार्य केले. त्यासंबंधात नेताजींनी दिलीप रॉय यांचेशी जे बोलणे केले ते रॉय यांनी अमृतबझार पत्रिका, हिंदुस्थान स्टँडर्ड यांसारख्या काही वृत्त-पत्रांत प्रकाशितही केले आहे. हिंदुस्थानातून प्रयाण करण्यापूर्वी हे बोलणे झाले होते व त्यात त्यांनी म्हटले होते की, 'आपणाला शिवाजीच्या धोरणाचे अनुकरण करावे लागेल.' त्यांनी Strategy असा शब्द वापरला आहे. तेव्हा नेताजींसारख्यांनीही महाराजांना श्रेष्ठ व अनुकरणीय पुरुष मानले होते; हे त्यावरून लक्षात येईल,

पुढे स्वातंत्र्य मिळाले. नंतर १९५७ साली महाराष्ट्रात अशी काही परि-स्थिती निर्माण झाली की एकेकाळी शिवाजीला 'बहकलेला देशभक्त' म्हणून

संबोधणाऱ्या थोर पुरुषालाही प्रतापगडावर येऊन शिवाजी महाराजांचा पुन्हां सन्मान करावा लागला. It is never too late to mend. परंतु महाराजांचा सन्मान करावा लागला तेव्हा ग्रहमान बदलले असे दिसते. आणि त्यापुढचा काळ अधिक शुभ ठरला. कारण श्रीमती इंदिरा गांधींनीसुद्धा मधल्या काळात शिवाजीला एक good character certificate दिल्याचे मला आठवते. तेव्हा एकूण सध्या महाराजांचे दिवस जरा बरे आहेत असे वाटायला लागते. हा समज गेल्या वर्षी आणखी पक्का झाला. कारण गेल्या वर्षी कॉम्रेड डांगे यांनी शिवाजीवर एक लेख लिहिला-आपल्यापैकी बहुतेकांनी तो वाचला असेल असे मी समजतो. कॉ. डांगे एक विचारवंत आहेत. आणि महाराजांसंबंधी ज्या काही गोष्टींचे स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता बऱ्याच दिवसांपासून होती, ते स्पष्टीकरण कॉ. डांगे यांनी आपल्या लेखात दिले आहे. त्यांनी लेखात असे म्हटले आहे की, हिंदू लोक परंपरागत पद्धतीने शिवाजींना जी काही विशेषणे लावतात त्यांचा अर्थ जगांतील इतर लोकांना समजत नाही. ' हिंदू कनोटेशन ' काय आहे, हे बाहेरच्या लोकांना माहिती नसते. त्यामुळे त्यांना हे काहीतरी बुरसटलेले ( obscurantist ) वाटते. पण ते तसे नाही. ' यासाठी त्यांनी उदाहरणादाखल दोन कल्पनांचे विवरण केले.

## कॉ. डांगे यांचे स्पष्टीकरण

एक म्हणजे अवतार-कल्पना. त्यांनी म्हटले की. हिंदूंमध्ये जी अवतार-कल्पना आहे ती फार obscurantist आहे, असे, ज्यांना यामागील माहिती नाही त्यांना वाटते. पण याचे एक ' कनोटेशन ' या देशात नेहमी राहिलेले आहे. महापुरुषाला अवतार ही संज्ञा देण्याची पद्धती या देशात पूर्वीपासून आहे. ज्या कालखंडात देशाची सामाजिक, आर्थिक परिस्थिती बिघडलेली असते, त्यात भ्रष्टता आणि विकृती आलेली असते, अशा कालखंडात एखादा महापुरुष निर्माण होऊन त्याने सामाजिक, आर्थिक परिस्थितीतील भ्रष्टता, विकृतता दूर करून समयानुकूल नवी समाजरचनापद्धती निर्माण केली तर त्याला ' अवतार ' ही संज्ञा देण्याची प्रथा आमच्या देशात आहे.

दुसरे स्पष्टीकरण दिले आहे ते ' गोब्राह्मण प्रतिपालक ' या संज्ञेविषयीचे ! ज्यांना या विशेषणाचा अर्थ माहीत नाही त्यांना महाराज हे 'ऑर्थोडॉक्स,' 'कॉन्झरव्हेटिव्ह ' अशा प्रकारचे होते असे वाटते. डांग्यांनी याचे ' कनोटेशन ' दिले की, ' मी गो-प्रतिपालक आहे ' असे जेव्हा शिवाजी म्हणाले, तेव्हा त्याचा अर्थ असा होता की, Agriculture based economy चे संरक्षण करण्याचे त्यांनी स्वीकारले होते. Agriculture based economy चे गाय हे 'सिंबॉल' होते. त्यावेळी हीच economy होती. हा जो आर्थिक ढांचा, त्याचे संरक्षण करीन... म्हणजे देशाची

आर्थिक स्थिती चांगली ठेवीन, असे आश्वासन गो-प्रतिपालनात होते. आणि 'ब्राह्मण प्रतिपालक' याचा अर्थ एका विशिष्ट जातीचे प्रतिपालन मी करीन असा नव्हता. त्याचेही एक 'कनोटेशन' आहे. त्याकाळी जे काही राज्यकर्ते होते, त्यांची इच्छा म्हणजे कायदा, अशी स्थिती होती. आमच्याकडे 'ब्राह्मण' हा शब्द, 'कायदा' (लॉ) या अर्थाने वापरतात. म्हणून येथे The Rule of Law राहील. Rule of individual राहणार नाही; जो राजा आहे, तो आपल्या मनाप्रमाणे स्वच्छंद वागेल, मनमानी करील. अशी सुलतानशाही येथे राहणार नाही; तर स्वतःला मी Subject to the rule of Law प्रमाणे ठेवीन हे आश्वासन शिवाजीने दिले. असे हे स्पष्टीकरण डॉ. डांगे यांनी दिले आहे. तेव्हा महाराजांचा ३०० वा पुण्यतिथीचा प्रसंग येत आहे, अशा वेळी गुरु, शुक्र, शनी, मंगळ हे त्यांच्या कुंडलीतील ग्रह फार चांगल्या स्थितीत आहेत, असे दिसते. त्यामुळे हा जो पुढील वर्षीचा उत्सव होईल, तो फार चांगला होईल. सगळ्यांचे त्याला सहकार्य मिळेल अशी आशा करावयास हरकत नाही. माणसाच्या जन्मपत्रिकेतील ग्रहांचा परिणाम मृत्यूपर्यंतच सीमित नाही. पुढेही तो अखंड चालत राहतो ही गोष्ट यामुळे माझ्या लक्षात आली. हा प्रभाव सर्वांच्याच बाबतीत होत असेल; पण श्रेष्ठ पुरुषांप्रमाणे तुम्हा आम्हा सामान्यांच्या कुंडलीचा अभ्यास कोण करतो ?

## महाराजांचे व्यक्तिमत्व

शिवाजी महाराजांसंबंधी म्हटले तर बरेचसे काही प्रकाशात आलेले आहे आणि कदाचित बरेचसे काही प्रकाशात आलेले नसेल. कारण सर्वंकष असे त्यांचे चरित्र लिहिण्याचा जो प्रयास होता, तो अजून पूर्ण झालेला नाही. त्याला प्रारंभ झाला आहे की नाही हेही मला माहिती नाही. परंतु महाराजांचे चरित्र असे काही आहे की, ते पुष्कळसे माहिती आहे आणि बरेचसे माहिती नाही. महाराजांच्या एकूण व्यक्तिमत्वाविषयी आपल्याच नव्हे तर बाहेरील देशांमध्ये सुद्धा आता मान्यता आहे. परंतु त्यांच्या मनाचे, व्यक्तिमत्त्वाचे संपूर्ण आकलन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्यांच्यासंबंधीच्या काही ऐतिहासिक घटना ज्ञात आहेत. त्यांनी राज्य स्थापिले. राज्य स्थापणारे आणखीही काही होऊन गेले. परंतु शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे, मन:स्थितीचे रहस्य खरोखरच काय आहे, त्याचे महत्त्व काय आहे, हे समजावून घेण्याला पुष्कळ वेळ आहे आणि वावही पण आहे असे दिसते, त्यांच्याविषयी जितके अधिकाधिक संशोधन होत आहे, अधिकाधिक लिहिले जात आहे, वाचले जात आहे, विचार केला जात आहे, तितके तितके त्यांच्याविषयी समजून घेण्यासारखे अजून बरेचसे शिल्लक आहे असे ध्यानात येते.

## कुशल संघटक

महाराजांच्या व्यक्तिमत्वाचा विचार केला तर ते एक उत्कृष्ट संघटक होते ही गोष्ट आता सर्वांनी मान्य केली आहे. ज्यावेळी संपूर्ण हिंदुस्थान हतधैर्य झाला होता, हिंदूंचे स्वराज्य स्थापन करू शकतील अशा सामर्थ्याचे व ज्यांच्या तलवारीच्या भरवशावर अहिंदूचे साम्राज्य हिंदुस्थानच्या बाहेरही पसरत होते अशा मोठमोठ्या हिंदू सरदारांनी स्वराज्यस्थापनेची हिंमत सोडली होती. सर्वत्र आत्मविश्वासाचा संपूर्ण अभाव आढळून येत होता. अशा वेळी एक कोपऱ्यामध्ये, ' मी हिंदवी स्वराज्याची स्थापना करीन ' अशा प्रकारची प्रतिज्ञा करणे; आपल्या मनातील ही आकांक्षा आपल्या सवंगड्यांच्या मनामध्ये रुजविणे; दक्षिणेत पाच प्रबल बादशाह्या व उत्तरेतील एवढे मोठे मोगली साम्राज्य; आणि स्वत: साधनविरहित ' रावण रथी विरथ रघुराई ' अशी स्थिती असताना, ही आकांक्षा धारण करणे हे सुद्धा अत्यंत साहसाचे, आत्मविश्वासाचे, धैर्याचे काम होते. हें साहस त्यांनी स्वत: केलेच आणि इतरांच्या मनामध्ये ते रुजवून चारी बाजूंनी येणाऱ्या संकटांना तोंड देऊन पुरून उरेल असे अडिग–अटल संघटन उभे केले. ही त्यांची कुशल संघटकाची भूमिका सर्वांनी मान्य केली आहे.

## नीतिनिपुण सेनापती

सेनापती या नात्याने त्यांचे जे श्रेष्ठत्व होते त्याविषयी देशी व विदेशी अशा सर्वांनीच मान्यता दिली आहे. ज्या रायगडावर आपण उत्सव करीत आहोत त्याची निवड करताना महाराजांनी आपल्या चातुर्याचा, समरनीती जाणण्याचा परिचय दिला आहे. कोणी या गडाला दक्षिणचे ' जिब्राल्टर ' म्हटले आहे. दिल्ली आणि विजापूर दोन्हीकडून सारखेच Inaccessible, अत्यंत त्रासाचे व administration च्या दृष्टीने सोयीस्कर असे हे ठिकाण आहे. यावरून राज्यकारभार आणि सामरिक नीती या दोहोंतील महाराजांचे नपुण्य दिसून येते.

गनिमी काव्याविषयी महाराजांचे नाव आपण ऐकतोच. हल्ली गनिमी काव्याविषयी इतरांची प्रशंसा करणे हा काही लोकांचा उद्योग झाला आहे. माओ-त्से–तुंग, हो चि मिन्ह, चेग्वेवारा इत्यादींनी गोरिला वॉरफेअर उत्कृष्ट रीतीने चालविली यात शंका नाही. परंतु या मंडळींचा जन्म होण्याच्या पूर्वी शेकडो वर्षे स्वयंप्रतिभेच्या आधारावर, एकीकडे सर्वसाधनसंपन्न साम्राज्य व दुसरीकडे साधनविरहित अशा थोड्या लोकांचा गट असताना लढाईमध्ये गोरीला Technique चा उपयोग करणे, त्याचा विकास करणे, हे विशेष होते. एका फ्रेंच लेखकाने म्हटले आहे की, त्यावेळी नकाशे वगैरे काही व्यवस्थित उपलब्ध नसताना, Geography,

Topography यांचे विस्तृत ज्ञान शिवाजीसारख्याला कसे होते याचे आश्चर्य वाटते. तेव्हा लढाईचे एक नवे तंत्र, unprecedented असे तंत्र महाराजांनी विकसित केले. लढाईच्या तंत्राच्या दृष्टीने त्यांची गणना सिकंदर, सीझर, हॅनीबाल, नेपोलियन यांच्याबरोबर विदेशी लेखक सुद्धा करतात. त्यांच्या कर्तृत्वाचा हाही पैलू सर्वांच्या ध्यानात आला आहे.

## रचनात्मक कार्य

शिवाजी महाराजांनी राज्य स्थापन केले एवढीच गोष्ट नाही, तर आदर्श, संस्कृती, धर्म यांच्या आधारावर एक संपूर्ण रचना System निर्माण करण्याचा बृहत्प्रयास केला. त्यांचे हे योगदान आहे. Contribution आहे. त्याचे महत्त्व अनेकदा पुष्कळांच्या ध्यानात येत नाही. नेपोलियनने आपल्या मुलाला लिहिलेले शेवटचे पत्र त्याचे एक प्रकारे Public Testament, Political Testament आहे असे म्हटले जाते. त्यामध्ये नेपोलियनने स्वतःचे मूल्यांकन केले आहे. त्यात त्याने म्हटले आहे की, मी किती लढाया जिंकल्या हे इतिहासाच्या ध्यानात कदाचित राहणार नाही, परंतु मी ज्या सुधारणा केल्या, जो कायदा केला, आणि संयुक्त यूरोप राज्याचे जे एक स्वप्न उराशी बाळगले, त्याकरिता माझे नाव इतिहासात लिहिले जाईल. आज तसे झालेले नाही. आज लढायांविषयीच नेपोलियन लोकांच्या जास्त स्मरणात आहे.

शिवाजी महाराजांच्या रचनात्मक कार्याचा देशावर जो काही परिणाम झालेला आहे त्याचे महत्त्व लोकांच्या ध्यानात तितकेसे येत नाही, पण त्यांनी ते कार्य केलेले आहे. त्यांची स्वतःची अशी विशेष मुलकी व्यवस्था ( Civil administration ) होती. त्यांनी ज्या काही लढाया केल्या, त्याशिवायही काही सैनिकी व्यवस्था होती. त्यांनी स्वतःला ' छत्रपती ' हा किताब घेतला. ज्याला System build up करावयाची आहे, रचना करावयाची आहे, त्याला प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करावी लागते. सामान्यतः ज्या चकाकणाऱ्या, ठळक नजरेत भरणाऱ्या गोष्टी असतात ( ग्लिटरिंग अॅन्ड ग्लॅमरस ) त्या लोकांच्या ध्यानात येतात. भविष्याचा विचार करून काळजीपूर्वक जे कार्य होते ते लक्षात येत नाही. ' छत्रपती ' ही पदवी त्यापूर्वी कित्येकशे वर्षे, काही हजार वर्षे, कोणी घेतली नव्हती. हिंदूंच्या इतिहासात निरनिराळ्या पदव्या असल्याचे दिसते. ' विक्रमादित्य ' ही एक पदवी होती. ती फार काळ चालली. परंतु महाराजांनी ती पदवी न घेता ' छत्रपती ' ही पदवी का घेतली असेल ? या दोहोंच्या Mental Associations मध्ये कितीतरी फरक आहे. ते ' विक्रमादित्य ' तर होतेच, ते सांगण्याची आवश्यकताच नव्हती. पण ' मी विक्रमादित्य आहे ' या गोष्टीवर त्यांनी भर दिला

नाही. तर ' मी छत्रपती आहे. ' असे त्यांनी म्हटले. ' ' छत्र ' या शब्दात ' छाया ' ' संरक्षण ' हा जो काही भाग– मानसिक साहचर्याचा– त्यावर त्यांनी जोर दिला.

हल्ली ही गोष्ट मान्य झाली आहे की, महाराजांचे राज्य हे सेक्युलर राज्य होते. परंतु हे शिवाजीविषयी तेवढे वेगळे का म्हणतात हे आपल्या ध्यानात आले नाही. शिवाजी हे एक हिंदू राजे होते, तेव्हा ते सेक्युलर होते हे ओघानेच आले. अलग म्हणण्याचा अर्थ असा होईल की, इतिहास काळात जे काही हिंदू स्टेट्स् होते ते सेक्युलर नव्हते. एखाद्या माणसाच्या डायरीत जर तुम्ही असे लिहाल की, ' आज हा इसम दारू प्याला नाही ' तर हे सत्य असले तरी ते डेंजरस सत्य आहे. कारण त्याचा अर्थ असा होतो की, तो इसम कदाचित इतर दिवशी दारु पीत असेल. तसेच शिवाजी राजा हा हिंदू राजा होता आणि सेक्युलर होता हे म्हणणे फार डेंजरस आहे. कारण प्रत्येक हिंदूराज्य हे सेक्युलॅरिझमवरच आधारित असते. त्या कालखंडाचा विचार करता सेक्युलर राज्य ही एक अभिनव गोष्ट होती, हे खरे आहे. हिंदुस्थानात त्यावेळी कोणतेही सेक्युलर राज्य अस्तित्वात नव्हते. त्या दृष्टीने त्या कालखंडात ती अभूतपूर्व घटना होती. हिंदू इतिहासामधील अभूत-पूर्व घटना नव्हे ज्याकरिता काफीखान आणि इतर सर्वांनी मोठी प्रशंसा केली आहे असे हे जे ' सेक्युलर कॅरेक्टर ' ठेवण्यात आले ते त्यांच्या रचनात्मक कार्या-मध्ये मोडते.

## आत्मविश्वासाची जागृती

महाराजांनी आपल्या नावाने शक चालू केला. हा शक १८१८ पर्यंत चालत आलेला होता. ' हिंदू स्वतः आपले उत्थान करू शकत नाहीत, गुलाम राहणे हेच त्यांचे जीवितकार्य आहे ' असे लोकांच्या मनामध्ये जे एक Demoralization होते, ते नाहीसे करून त्यांचा आत्मविश्वास जागृत करण्यासाठी मुद्दाम, स्वतःला राज्याची इच्छा नसताना, स्वतःच्या राज्याभिषेकाचा सारा समारोह यथाविधी घडवून आणला. राज्यव्यवहाराची नवी पद्धती निर्माण केली. अष्टप्रधानपद्धती – Council of Ministers पुन्हा Introduce केली. हे त्यांना आवश्यक होते असे नाही. ' मी कोणालाच प्रधान करीत नाही ' ! मी स्वतःच राजा आहे; ' असे म्हटले असते तर काही मोठी गडबड उडाली असती अशातला भाग नाही. परंतु एक Rule of Law धर्माचे राज्य व्हावे म्हणून Council of Ministers याची निर्मिती केली. शक निर्माण केला. अशा प्रकारच्या ज्या व्यवस्था निर्माण केल्या त्या सर्वांचा विचार केला तर ते सिस्टीम बिल्डर होते, ही गोष्ट आपल्या ध्यानात येते. आणि त्यातून एकूण राष्ट्रनिर्माण कार्याला त्यांचे फारच मोठे योगदान ( contribution ) झाले आहे असे आपणाला दिसते. प्रत्येक गोष्टीत त्यांची

विचार करण्याची पद्धती मौलिक, मूलभूत होती. शुद्धीकरणाविषयीचा उल्लेख येऊन गेला आहेच. पुढे येणाऱ्या काळातील सागरी सत्तेचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. त्या दृष्टीने स्वतःचे आरमार तयार करावे, सिंधुदुर्ग तयार करावेत या गोष्टींवर त्यांनी फार मोठा भर दिला होता. यासंबंधात परमपूजनीय श्रीगुरुजी असे म्हणत असत की, शिवाजीचा हा पैलू लोकांच्या विशेष लक्षात आलेला नाही. यासाठी ते अशीही सूचना करीत की, महाराज घोड्यावर बसले आहेत असेच त्यांचे चित्र वा पुतळे तयार केले जात आहेत, त्याचबरोबर महाराज आरामारावर आहेत, जहाजावर आहेत आणि समोर हात दाखवीत आहेत, तलवार दाखवित आहेत अशीही चित्रे किंवा पुतळे तयार झाले पाहिजेत. कारण एकूण इतिहासाच्या तपशीलात दिल्ली, विजापूर, गोवळकोंडा हा भाग इतका काही आपल्या मनामध्ये भरतो की, सागरी सत्तेचे महत्त्व महाराजांनी ओळखले होते, स्वतःचे आरमार बांधण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला होता, त्या दृष्टीने विदेशी सत्तांची माहिती ते बारकाईने गोळा करीत असत, तशा प्रकारचे संबंध त्यांनी त्यांच्याशी ठेवले होते, कोणालाही वरचढ किंवा डोईजड होऊ न देता सलोख्याचे संबंध ठेवले होते व त्यांच्यापासून आपणाला केवळ व्यापारच नव्हे तर शस्त्रास्त्रे, दारूगोळा (Artillery) तोफखाना यासंबंधी काय घेण्यासारखे आहे यासंबंधी विदेशी मंडळींशी त्यांनी विचारविनिमय केला होता आणि जंजिऱ्याचा सिद्दी व इतर लोकांना आळा घालून सागरावर आपली प्रभुसत्ता असावी असा बृहद् दृष्टिकोन त्यांचा होता ही गोष्ट जितक्या प्रामुख्याने लक्षात यावयास हवी तितक्या प्रमाणात येत नाही.

कोणत्याही राष्ट्रनिर्मात्याला केवळ राजकीय, शासकीय विचार करून चालत नाही. केवळ सैनिकी विचार करून चालत नाही. समाजाचाही विचार करावा लागतो. 'त्या दृष्टीने सामाजिक जागृतीकरण' म्हणजेच शिवाजीचा अवतार असे अनेकदा म्हणण्यात आले आहे. कॉज अँन्ड इफेक्ट—कारण आणि परिणाम–शिवाजी आणि सामाजिक जागृती हे परस्परांचे कारण आणि परिणाम आहेत हे मान्य करण्याइतकी माहिती आता सर्वांच्या समोर आहे. केवळ एका व्यक्तीच्या मनामध्ये आले, कोणा आईच्या आणि वडिलांच्या मनामध्ये आले की आपला मुलगा राजा व्हावा, म्हणून त्याचे राज्य निर्माण झाले असे नव्हते; तर त्यावेळेला सगळ्या देशामध्येच एक जागृतिकरण चालले होते. शिवाजी हा एकप्रकारे शतकानुशतके जो एक वैचारिक, सांस्कृतिक प्रवाह वाहात आलेला होता त्याचे एक संकलित फळ होय. शिवाजीच्या जन्मामुळे या प्रवाहाला चालना गती मिळाली असे म्हणता येण्यासारखे आहे. राज्यस्थापना हा शिवाजीचा एक अलग असा एकलकोंडा प्रयत्न (isolated) नव्हता. एकांडा कार्यभाग नव्हता तर या देशामध्ये परकीय आक्रमण सुरू झाल्यापासून त्याविरुद्ध हिंदूंचा प्रतिकार, स्वराज्यरक्षण आणि

स्थापन याचा प्रयास अखंड चाललेला होता. त्यात एकही दिवस खंड पडलेला नव्हता. आपल्यासमोर ज्या पद्धतीने आपला इतिहास ठेवला. जातो त्यामुळे एक चुकीचे विकृत ( Distorted ) चित्र उभे राहते. इतिहासात पीरियड्स् दिलेले आहेत. हिंदू पीरियड, मुस्लिम पीरियड, ब्रिटीश पीरियड असे ! परंतु एकाच वेळी सर्वत्र यावनी साम्राज्य राहिले आहे असे नाही. त्यांच्याविरुद्ध हिंदूंचा अखंड प्रतिकार चालू होता. परकीयांची राजधानी कधी फत्तेपूर शिक्री, कधी दिल्ली तर कधी आग्रा राहिली; तशी स्वतंत्र हिंदुस्थानची ही राजधानी बदलत गेली. असे असले तरी स्वतंत्र हिंदुस्थानला स्वतःची अशी स्वतंत्र राजधानी ही नेहमीच होती. ती कधी उदयपूर असेल, कधी चितोड, कधी विजयानगर तर कधी रायगड असेल. पण एका वेळेला दोन राजधान्या या सबंध बाराशे वर्षांच्या काळात सतत नांदत आलेल्या आहेत. एक आक्रमकांची राजधानी तर दुसरी हिंदवी स्वराज्याची राजधानी. राजधान्यांची स्थाने बदलली असतील, रणक्षेत्रे बदलली असतील, सेनापती बदलले असतील, शस्त्रास्त्रे बदलली असतील, पण लढाई तीच! आक्रमकांविरुद्ध स्वराज्य संस्थापक ! जयपाल, अनंगपाळापासून तर आतापर्यंत जी एक तेजस्वी परंपरा चालत आलेली आहे – अखंड शृंखला – त्यामधील एक तेजस्वी कडी, तेजस्वी दुवा म्हणून शिवाजी महाराजांच्या प्रयत्नांचे स्थान आहे.

## परंपरेचा आविष्कार

शिवाजी महाराजांच्या या स्थानाची जाणीव आपणास आहे. हा जो ध्वज होता तो कधी खाली पडलेला नव्हता. आम्हाला कधी माघार घ्यावी लागली असेल. जसे चर्चिलने म्हटले आहे " We may lose battles but would win war " आम्ही लढाया हरल्या असोत. पण आमचे युद्ध अखंड चालू होते. पंजाबने झेंडा खाली ठेवला न ठेवला तो राजपुतान्याने तो घेतला. राजपुतान्याच्या हातून तो पडतो न पडतो तोच विजयनगरने तो घेतला. आणि विजयनगरच्या हातून तो खाली पडत नाही तोच तो रायगडाने उचलला. अशी ही अखंडता (Continuity) सातत्य या प्रयत्नांत आहे. ही जी राष्ट्रीय अस्मितेची परंपरा आहे, त्या परंपरेचा एक तेजस्वी आविष्कार असे वर्णन महाराजांचे करता येईल. कारण तोपर्यंत सर्वत्र पराभूत मनोवृत्ती प्रसृत झाली होती. ती नाहीशी करणे हे राज्यस्थापन करण्यापेक्षाही कठीण काम होते. ते महाराजांनी केले.

महाराजांच्या प्रयासाचे एवढेच काही महत्त्व नाही. राज्यस्थापना हा एक वरचा – दृश्य – आविष्कार आहे. 'सिम्प्टम' आहे. हिंदुस्थानात सर्वत्र जनजागृती, धार्मिक जागृती, सांस्कृतिक जागृती ही अखंड चालू होती. या जागृतीला अलग अलग प्रांतांत, अलग अलग कालखंडात बहर आला ही गोष्ट खरी आहे. पण

जागृतीची ही एक प्रकारची प्रक्रिया अखंडपणे चालू होती. महाराष्ट्रात तर संतांची जी परंपरा निर्माण झाली, त्या परंपरेने राष्ट्रीयत्वाला वाचविले, हिंदू संस्कृतींला वाचविले. लोकांमध्ये स्वाभिमान निर्माण केला आणि हा स्वाभिमानच जणू शिव-रायांच्या रूपाने शरीर धारण करता झाला, असे लोकांना वाटावयाला लागले.

## अखिल भारतीय दृष्टिकोन

मध्यंतरी आमच्याकडे काही प्रोग्रेसिव्ह लोक आले होते. प्रोग्रेसिव्ह होणे फार सोपे असते. त्यांनी असा दृष्टिकोन मांडला की, हे संत लोक केवळ टाळकुटे होते. त्यांनी काही जागृती वगैरे केली नाही. उलट त्यांनी लोकांना निष्क्रिय बनविले होते आणि या धार्मिक भक्तिसंप्रदायाचा परिणाम राजकीय स्थितीवर काहीही झालेला नाही. परंतु आता या लोकांचा Progressivism कमी व्हायला लागला आहे असे दिसते. कारण हल्ली काही कम्युनिस्ट लेखकांनीसुद्धा ही गोष्ट मान्य केली आहे की, पंजाब, महाराष्ट्र, मध्य हिंदुस्थान या भागांमध्ये ज्या काही राज्यक्रांत्या झाल्या त्यामागे प्रेरणा म्हणून भक्तिसंप्रदायाचा हा प्रचार होता. उशीरा का होईना, पण ही गोष्ट आता त्यांच्या ध्यानात आलेली आहे. तेव्हा राष्ट्रीय अस्मि-तेची ही जी लाट होती त्या लाटेचे वरचे टोक म्हणजे छत्रपती शिवाजी असा भास समकालीन लोकांना होणे स्वाभाविक होते. आणि शिवाजींनी सुद्धा राज्यस्थापनेचा प्रयास केला तो सत्तालिप्सेतून केला नाही हे आपल्या ध्यानात येईल. राज्यस्थापने मागे अखिल भारतीय दृष्टी होती. अखिल भारतीय स्वराज्याची दृष्टी होती. ज्या पद्धतीने ते आग्र्याला गेले, जाताना निरनिराळ्या लोकांशी सल्लामसलत झाली, ज्या पद्धतीने छत्रसालाशी संबंध ठेवले, ज्या कारणाने गुरु गोविंदसिंहांना इकडे यावे असे वाटले आणि इकडची स्थिती पहावी, सल्ला मसलत करावी असे वाटले-या सर्व गोष्टींचा विचार केला तर त्यामागे अखिल भारतीय दृष्टिकोन होता हे लक्षात येते.

मिर्झा राजे जयसिंह यांना महाराजांनीं लिहिलेल्या पत्राबद्दल काही विद्वान मंडळींनी शंका प्रकट केली आहे. मला असे वाटते की, त्यांनी याबाबत फार थोडी शंका व्यक्त केली. खरे म्हणजे शिवाजी महाराज जन्मले होते की नाही येथूनच शंका घेतली असती तर ही मंडळी अधिक बुद्धिमान ठरली असती. तथापि महा-राजांनी जयसिंहास पत्र लिहिले की नाही हा प्रश्न आपण विद्वानांवर सोडू. पण ते पत्र आपल्यासमोर आहे. त्यात त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, तुम्ही परक्यांची सेवा का करता ? मला दिल्लीचे राज्य नको आहे. तुम्ही येथे या, आपण दोघेही एकत्र येऊ. मी सर्व दक्षिण निष्कंटक करतो आणि माझ्या सेनेसह, दलबलासहित मी आपल्या चरणी रुजू होतो. तुमच्या नेतृत्वाखाली आपण दिल्लीवर चाल करून

जाऊ. तिथे उदयपूरच्या राण्याच्या नेतृत्वाखाली हिंदवी स्वराज्याची स्थापना करू. अशा प्रकारची भाषा त्या पत्रात आहे. काही विद्वानांना हे पत्र खरोखरच लिहिले गेले होते की नाही याबद्दलची शंका आहे. आपण इतिहाससंशोधक नसल्यामुळे सुखी आहोत. परंतु दुसरे एक अशा प्रकारचे पत्र माझ्या पाहण्यात आले असल्यामुळे हे पत्र लिहिले गेले असावे असे वाटण्यास बळकट जागा राहते. ज्ञानकोशकार श्री. व्यं. केतकर यांना ब्रिटिश म्युझियममध्ये नानासाहेब पेशवे यांच्या एका पत्राचे इंग्रजी भाषांतर सापडले. ते त्यांनी प्रसिद्ध केलेले आहे. ' मूळ पत्र सापडले नाही ' असे त्यांनी म्हटले आहे. आता ते उपलब्ध झाले आहे की नाही हे मला माहिती नाही, कारण मी काही इतिहास संशोधक विद्वानांपैकी नाही. पानिपतची लढाई हरल्यानंतर नानासाहेब पेशवे यांची सगळी हिंमत हरली होती असा गैर-समज आपल्याकडे पसरविण्यात आला आहे, परंतु या त्यांच्या पत्रावरून तसे काही दिसत नाही. नानासाहेबांनी हे पत्र जयपूरच्या महाराजांना लिहिले आहे. त्यात त्यांनी लिहिले आहे की, आम्ही लढाई हरलो हे आमचे नुकसान झाले आहे. परंतु यामध्ये दिल्लीचीही शक्ती कमी झालेली आहे. आता यापुढे आपणाला खरोखर कोणापासून धोका असेल तर तो इंग्रजांपासून आहे. कलकत्ता हे इंग्रजांचे केंद्र आहे. इंग्रजांना आताच जर आपण नष्ट केले नाही तर पुढे त्रास होईल असे म्हणून नानासाहेबांनी पुढे असे म्हटले आहे की, जयपूरच्या राजांनी भूमिमार्गाने म्हणजे उत्तरप्रदेश वगैरेमधून बंगालमध्ये यावे व मी जहाजांतून माझी सेना येथून पाठवितो. तेव्हा समुद्रमार्गाने आम्ही व भूमिमार्गाने तुम्ही असे दोघे मिळून कलकत्त्यावर हल्ला करू शिवाजी महाराजांनी जयसिंहाला लिहिलेल्या पत्रातील भाव – स्पिरिट – आणि या पत्रामधील भाव इतका सारखा आहे की, इतिहासाच्या विद्वानांनी शिवाजीच्या पत्राविषयी काहीही म्हटले तरी अशा प्रकारचे पत्र गेले असावे असे समजण्यास जागा भरपूर आहे.

## राज्य -- ध्येयप्राप्तीचे साधन

या पत्रांमधून अखिल भारतीय दृष्टिकोन दिसून येतो. हाच अखिल भारतीय दृष्टिकोन असल्यामुळे शिवाजी महाराजांनी छत्रसालाला जी एक प्रकारची वागणूक दिली तशाच प्रकारची वागणूक बाजीरावाने दिलेली आहे यात अखिल भारतीय धोरणाचे सातत्य आढळून येते. त्याचबरोबर हे जे काही राज्य आहे ते एका व्यक्तीचे, एका घराण्याचे, एका जातीचे किंवा एका प्रदेशाचे नव्हे, ही भावना होती. राज्याविषयी आसक्ती नव्हती, तर एका मोठ्या ध्येयाच्या प्राप्तीचे एक साधन म्हणून केवळ त्यांनी राज्याकडे पाहिले, असे त्यांच्या चरित्रावरून दिसते. स्वा. सावरकरांनी आपल्या ' हिंदुपदपादशाही ' या पुस्तकात त्यांची कितीतरी

उदाहरणे ( कोटेशन्स ) दिली आहेत. ' हिंदवी स्वराज्य व्हावे, ऐसे श्रींचे मनात फार आहे, ' असे महाराजांनी म्हटले. त्यांनी असे नाही म्हटले की, माझ्या आईच्या मनात आहे, जातवाल्यांच्या मनात आहे. पार्टीच्या मनात आहे. जेव्हा त्यांना कोणी म्हटले की, 'राजे, हा किताब आम्हाला पातशहाने दिला आहे! ' तेव्हा उत्तरात महाराज म्हणतात की, तुम्हाला 'राजे'... हा किताब बादशहाने दिला असेल, आम्हाला हे राज्य श्री शंभूने दिले आहे. आता हे Sale deed कोठे झाले असेल किंवा ही गिफ्ट कुठे register केली गेली असेल ? पण त्यामागील भावना काय आहे ही समजून घेण्याची गोष्ट आहे.

## अभक्तांचा क्षयो झाला

स्वराज्याची स्थापना झाल्यानंतर, महाराजांना राज्याभिषेक झाल्यानंतर, समर्थ रामदासांनी ' आनंदवनभुवनी ' हे प्रकरण आनंदाने लिहिले आहे. त्यामधील वर्णन मॉडर्न माणसाला जरा बुचकळ्यात टाकणारे आहे. त्यांत त्यांनी ' एक पार्टी गेली व दुसरी आली ' असे म्हटलेले नाही. त्यांनी म्हटले,

बुडाला औरंग्या पापी, म्लेंछ संहार जाहला ।
मोडिली मांडिली क्षेत्रे, आनंदवनभुवनी ॥
बुडाले सर्वही पापी, हिंदुस्थान बळावले ।
अभक्तांचा क्षयो झाला, आनंदवनभुवनी ॥

आणि आमच्या फौजा सर्वत्र हिंडू लागल्या तर ते म्हणतात की, ' त्रिखंडी चालल्या फौजा–हरिभक्तांच्या ' आता ही काय बोलण्याची पद्धती झाली ? म्हणे, बुडाला औरंग्या पापी; तो पापी की पुण्यवान याच्याशी काय करावयाचे आहे ? दुसऱ्या पार्टीचा आहे असे म्हटले की पुरे ! पण तसे ते म्हणत नाहीत. तसेच ' म्लेंच्छ संहार जाहला', ' मोडिली मांडिली क्षेत्रे आनंदवनभुवनी,', 'अभक्तांचा क्षयो झाला ' असे म्हणतात. हिंदूंचा, मुसलमानांचा, ख्रिश्चनांचा, पार्टीवाल्यांचा, असे त्यांनी म्हटले नाही. म्हटले की, ' अभक्तांचा क्षयो झाला' आणि येवढी जी उलथापालथ झाली तिची फलश्रुती काय तर–

उदंड जाहले पाणी स्नानसंध्या करावया ।
जपतप अनुष्ठाने आनंदवनभुवनी ॥

असे म्हटले इकडे इतक्या राजकीय भानगडी झाल्या तरी हे म्हणतात की, स्नानसंध्येला पाणी उपलब्ध झाले. ही फार मोठी फलश्रुती आहे. यापूर्वी नद्या काही कोरड्या पडल्या नव्हत्या, पण हा जो एक दृष्टिकोन होता, तो केवळ समर्थांचा

नव्हता, तर तत्कालीन सर्व देशभक्त समाजाचा होता. धर्माची स्थापना हे ध्येय व ते साधण्याचे साधन म्हणून राज्य. राज्यप्राप्ती हे अंतिम साध्य नव्हे. समर्थांनीच म्हटले आहे की,

धर्मासाठी मरावे, मरोनी अवघ्यासी मारावे ।
मारिता मारिता घ्यावे, राज्य आपुले ॥

पण हे धर्मासाठी, राज्यासाठी नव्हे. आणखीही यासंबंधात समर्थांनी लिहिले आहे. 'विवेके विचारे राजकारणे अंतर शृंगारीजे ।' विवेकाला, विचाराला पहिले स्थान आहे. तसेच 'मुख्य ते हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण' या शब्दांनी साध्य–साधन विचार स्पष्ट केला आहे. ह्या दृष्टीने उपभोगाची वृत्ती, व्यक्तिगत आकांक्षा राज्यप्राप्तीमागे नसून समर्थांनी वर्णिल्याप्रमाणे 'सत्ता हे धर्मसंस्थापनेचे साधन' हा विचार छत्रपतींच्या संपूर्ण जीवनातून प्रकट होतो.

सकळ सुखांचा त्याग करूनी साधिजे हा योग ।
राज्यसाधनाची लगबग–केली पाहिजे ॥

म्हणजे सर्व सुखांचा त्याग करून राज्यसाधन नावाचा योग आपणाला साधावयाचा आहे असे म्हटले आहे. त्या 'योगा' साठी सर्व सुखांचा त्याग करावा लागेल. म्हणजे धर्मस्थापना हे ध्येय. त्याकरिता संपूर्ण काम करावयाचे. त्याचा एक भाग म्हणजे राज्यस्थापना.

## जनमानसाची भावना

ही भावना शिवाजीच्या अंतःकरणात असल्यामुळे कमीतकमी तीन वेळा शिवाजींना वैराग्याची ऊर्मी आलेली आपणास दिसून येते. (१) संत तुकाराम महाराजांच्या कीर्तनाला बसले असताना, (२) श्रीशैल्य दर्शनास गेले असताना, आणि (३) एकदा समर्थ भेटीच्या वेळी.

हे सगळे सोडावे, दुसरीकडे लागावे, आत्महत्त्या करावी अशा प्रकारची इच्छा कोणत्याही मॉडर्न पॉलिटिशियनच्या मनात चुकूनही येणार नाही. पण शिवाजींच्या मनात ती आली होती. त्यावेळच्या संपूर्ण समाजाची, जागृत समाजाची मनःस्थिती साधुसंतांनी जी निर्माण केली होती, तीच त्यांची होती. आणि म्हणून ज्यावेळी त्यांना राज्याभिषेक झाला त्यावेळी हा राज्याभिषेक एका व्यक्तीचा आहे असे कोणासही वाटले नाही. सगळ्यांना असेच वाटले की हा एका मनोवृत्तीचा राज्याभिषेक आहे. जणु काही धर्माचीच सिंहासनावर प्रस्थापना झाली आहे आणि शिवाजी हे केवळ त्याचे प्रतीक आहेत. अशा प्रकारची जनमानसाची भावना होती. हा भारताचा मनोवैज्ञानिक इतिहास आहे. 'सायकॉलॉजिकल हिस्टरी.'

लोक आजकाल इतिहासाचे पोलिटिकल हिस्टरी, क्रॉनॉलॉजिकल हिस्टरी, सोशल हिस्टरी, कल्चरल हिस्टरी असे भाग पाडतात. आमचे म्हणणे असे आहे की, हिंदुस्थानचा सायकॉलॉजिकल हिस्टरी पहा. तो पाहिल्यास असे दिसेल की, या देशाच्या आधुनिक मानसिक इतिहासातील सर्वात क्रांतिकारी घटना म्हणजे शिवाजी महाराजांचा जन्म, त्यांचे कार्य आणि त्यांचा राज्याभिषेक. त्यापासून आपणाला अखंड उपयोगी पडणारे धडे शिकावायला मिळतात. हे धडे धर्मसंस्कृतीच्या प्रवाहामधून निर्माण झालेले आहेत.

## मार्गदर्शक स्मृती

आजही आपण एका विशेष परिस्थितीत आहोत. आपल्याला आणि मला राजकारण समजत नाही ही गोष्ट चांगली आहे. परंतु हे स्वराज्य आहे. खंडित भारताचे का होईना परंतु हे स्वराज्य आहे आणि या राज्याच्या द्वारे जितके होऊ शकेल तितके राष्ट्रनिर्माणाचे कार्य करण्याची सवलत आपल्याला आहे. या स्थितीमध्ये, सिंहासनावर बसताना शिवाजी महाराजांची जी मनःस्थिती होती की, ' हे राज्य धर्माचे आहे, शिवबाचे नव्हे,' ती मनोवृत्ती घेऊन आजचे राज्यकर्ते चालले तर राष्ट्राचे वैभव आपण निर्माण करू शकू. ती वृत्ती सोडून दिली तर ? शिवाजीनंतरही राज्य विस्तृत झाले. ' अटक पासून कटक पावेतो ' असे त्याचे वर्णन केले जाते. सर्वत्र आमचे घोडे फिरून राहिले होते. सेना होत्या, सेनापती होते, अगदी ख्यातनाम सेनापती होते. सगळे काही होते, परंतु महाराजांनी शून्यातून सृष्टी निर्माण केली, तर पुढे ती सृष्टी मातीत मिसळली गेली. ह्या चमत्काराचे वर्णन करताना ' मराठ्यांच्या लढाया–१८०२ ते १८१८' या ग्रंथामध्ये शि. म. परांजपे यांनी म्हटले, आहे की मराठ्यांचे राज्य कोसळण्याची कारणपरंपरा अनेक लोक सांगतात. काहींचे म्हणणे असे की, मराठ्यांचे श्रेष्ठ पुढारी एकामागून एक दिवंगत झाले. महादजी शिंदे, हरीपंत फडके, नाना फडणविस वगैरे. एकामागून एक पुढारी गेल्यामुळे राज्याला धक्का बसला. पण हे खरे नाही. हे सगळे वाचले असते तरी राज्य वाचले असते अशी स्थिती नव्हती. नाना फडणविसासारखे फडात बसून राजकारण करणारे मुत्सद्दी किंवा रणात तलवार गाजविणारे महादजी शिंदे यांच्यामुळे राज्य वाचले नसते. कारण या सर्वांना योग्य प्रेरणा देणारा पुरुष त्यावेळी नव्हता.

तेव्हा ' राज्य हे साधन आहे ' ही प्रेरणा–मोटीव्हेशन–ही भावना घेऊन, आपला राज्यकारभार चालेल तर आपण आपले भाग्य बनवू शकतो. नाहीतर शिवाजीच्या वेळेला जो इतिहास झाला आणि नंतर त्याची जी परिणती झाली, ती आजही त्या दिशेने झाल्याशिवाय राहणार नाही. हा एक धडा आजही शिवाजीच्या इतिहासावरून आपल्याला शिकण्यासारखा आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करून पुन्हा एकदा सर्व दृष्टिकोनातून ( From all aspects) शिवाजीचे मूल्यांकन व्हावे, चरित्राचे बरोबर लेखन व्हावे, त्यांची स्फूर्तिदायी, प्रेरणादायी, मार्गदर्शक अशी स्मृती लोकांच्या मनात अखंड राहावी या दृष्टीने आपण जे उत्सव साजरे करतो त्या प्रकारचे उत्सव येथे आणि सर्वत्र नेहमी साजरे व्हावेत म्हणजे देशाला अखंड योग्य मार्गदर्शन होत राहील. अशी जागृती सर्वत्र झाली तर जे स्वत: चांगल्या मार्गावर येऊ शकत नाहीत अशा पुढाऱ्यांना शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने जागृत झालेली जनता योग्य दिशेला जाण्याकरिता भाग पाडू शकेल ही एक आशा आजच्या प्रसंगाने मनात निर्माण झाली. तेव्हा ही आशा, आपणास धन्यवाद आणि आनंद या तीनही गोष्टी प्रकट करतो.

□ □ □

# महाराजांचा मार्गदर्शक व्यवहार

## मा. मोरोपंत पिंगळे

अनेक वर्षांपासून या दिवशी येथे उपस्थित राहण्याची संधी मला मिळत आली आहे आणि त्यामुळे त्या त्या वेळी आवश्यकता पडली त्या गोष्टींची पूर्तता करण्यात मी सहभागी होत असे. गेली २० वर्षे हा उपक्रम चालू असूनही प्रत्यक्ष उत्सवामध्ये भाषण करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

शिवाजी महाराजांसंबंधीच्या अनेक कथा आपण वाचल्या असतील, त्या कथांचे मनन केले असेल. अशी एखादी कथा, प्रसंग किंवा त्यामुळे उत्पन्न होणारे विचार सांगावे असे नाही. महाराजांच्या कार्याबद्दल, उपक्रमाबद्दल, त्यांनी केलेल्या गोष्टींबद्दल विचार केला असता सर्वांमागे काही ना काही सूत्र असले पाहिजे हे उघडच आहे. अनेक लहानमोठी महत्त्वाची कामे करणारी माणसे अनेक होतात; परंतु सगळ्या गोष्टी डोळ्यांसमोर ठेवून एक व्यापक, सर्वांगीण विचार करून त्या कामांची उभारणी करणे व ती आपल्या आयुष्यात यशस्वी झालेली पाहणे हे भाग्य फारच थोड्या लोकांच्या वाट्याला येते. असे जे महापुरुष होऊन गेले त्यांमध्ये शिवाजी महाराजांचे नाव आपण प्रामुख्याने घेतो. म्हणूनच इतकी वर्षे होऊनही त्यांच्याबद्दलचा आदर सर्वांच्या मनात आहे.

गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी आपल्या कामाचे वर्णन ' परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ' असे केले आहे. हे वर्णन केवळ श्रीकृष्णाच्याच कार्याला लागू पडते असे नव्हे, तर कोणत्याही महा-पुरुषाच्या कार्याला ते लागू पडेल. यात वर्णिलेली तीनही प्रकारची कामे केली असतील तो महापुरुष. यापैकी एकेक काम करणारे पूर्वी झाले आहेत; आजही आहेत व पुढेही होतील. परंतु एकाच माणसाने एखाद्या परिस्थितीची पूर्ण कल्पना करून त्या ठिकाणी चालणाऱ्या चांगल्या कामांचा पाठपुरावा, चांगल्या माणसांचे संरक्षण, त्या कामाला अडथळा करणाऱ्या दुष्टांचे निर्दालन आणि एवढ्यानेच न भागता, योग्य काय, चांगले काय, धर्म कोणता यांचा विचार करून सद्धर्माची प्रतिष्ठापना करणे या तीनही प्रकारांनी जे लोक काम करतात ते खरे मोठे पुरुष होत. शिवाजी महाराजांनी आपल्या जीवितकाळात हे तीनही प्रकारचे उपक्रम केले. त्यांनी चांगल्या लोकांचे संरक्षण केले. दुष्ट शक्तींचा निःपात केला आणि प्रत्येक गोष्टीसंबंधी योग्य दृष्टिकोन कसा असावा यासंबंधी भावी पिढ्यांना मार्गदर्शक होईल असा व्यवहार त्यांनी केला.

आज संस्कृत भाषेच्या संबंधात सर्वत्र चर्चा चालते. शिवाजी महाराजांनी आपल्या व्यवहाराची भाषा संस्कृत करून तिचा पुरस्कार अधिकाधिक करण्याचा प्रयत्न केला. प्रलोभनामुळे परंपरागत उपासनापद्धती सोडून दुसरी उपासनापद्धती स्वीकारण्यासंबंधाचा विषय आजही चर्चेचा बनलेला आहे. एकदा ज्याचे धर्मपरिवर्तन झाले त्याला पुन्हा हिंदू करून घेता येणार नाही, असे काहीजण म्हणतात. हिंदूचा मुसलमान होऊ शकतो, ख्रिश्चन होऊ शकतो, आणखी कोणी होऊ शकतो, पण अशा व्यक्तीला परत हिंदू करून घेता येते किंवा नाही याबद्दल पूर्वी आणि आताही चर्चा चालू होती व आहे. त्यावर सर्व प्रकारे एकमत झाले आहे असे नाही. आजही आपल्या देशात अशाप्रकारचा कायदा करण्याची गरज भासते व त्यालाही विरोध होताना दिसतो. ३०० वर्षांपूर्वी महाराजांनी विधर्मात गेलेल्या अशा माणसांना आपल्या धर्मात तर आणलेच, परंतु आजही अडचणीची वाटणारी गोष्ट त्या काळी त्यांनी आपल्या कुटुंबाशी विवाह या नात्याने प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करून कोणतीही अडचण येऊ दिली नाही. धर्मपरिवर्तनानंतर उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक आपल्या उदाहरणाने लोकांच्या समोर ठेवली. अशा अनेक बाबींमध्ये दूरदृष्टी–पुढची दृष्टी ठेवून केवळ तात्कालिकच नाही तर अनेक वर्षांपासून या देशाला, या समाजाला सतावणारे जे प्रश्न आहेत त्या सर्वांचे उत्तर देशाच्या सुरक्षिततेच्या, समाजाच्या स्वास्थ्याच्या आणि सन्मानाच्या दृष्टिकोनातून विचार करून दिले आहे.

त्यामुळे शिवाजी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास केला पाहिजे. त्यांच्या मोठेपणाचा केवळ गुणगौरव न करता त्यांनी केलेल्या गोष्टींचा उपयोग प्रत्यक्षात आपणाला कसा होईल याचा विचार केला पाहिजे. ही आपली जबाबदारी असल्याने आपण येथे येत असतो. गावोगाव प्रतिवर्षी शिवाजी महाराजांचे उत्सव होतात. पुढल्या वर्षी महाराजांची ३०० वी पुण्यतिथी आहे. त्या निमित्त होणारा उत्सव कशाप्रकारे करावा याचा विचार अनेकांच्या मनांत येणे स्वाभाविक आहे. पुढील वर्षभराच्या काळात या विचाराला चालना मिळावी. सगळ्या जगात हिंदुस्थानाची सन्मानाची स्थिती उत्पन्न करण्यासाठी ज्या गोष्टी उपयोगी पडणार आहेत, त्यामध्ये शिवाजी महाराजांचे नाव आणि त्यांनी केलेले कार्य ही फार मोलाची गोष्ट आहे. ज्यामुळे जगभर हिंदुस्थान मानला जाईल अशा कारणांमध्ये शिवाजी महाराजांचे नाव फार उपकारक ठरणारे आहे. त्यामुळे आपल्या देशात हा उत्सव जसा व्हावा, महाराजांच्या कार्याचे चिंतन व्हावे तसेच विदेशांमध्येही यासंबंधी काय करता येईल हाही विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या सर्व गोष्टींसंबंधी कार्यकर्ते विचार करीत आहेत. त्यासाठी आपलाही सर्वांचा सहभाग असावा ही विनंती आहे. □ □

मूल्य : एक रुपया

# भारतीय विचार साधना

१८४७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

## – आमची प्रकाशने –

| | |
|---|---|
| १) ही जुलुमावर धीट चढाई (लेखक – चंद्रशेखर वाघ) | ३–०० |
| २) अप्रतिहत ही अमुची प्रगती | २–०० |
| ३) एकात्मतेचा मार्ग | ३–०० |
| ४) सेवेतून समाजपरिवर्तन | १–०० |
| ५) प्रार्थना आणि प्रात:स्मरण | ०–६० |
| ६) केशव: संघनिर्माता (लेखक – चं. प. भिशीकर) | १५–०० |
| ७) हैदराबादका मुक्तिसंग्राम (हिंदी) (लेखक –आचार्य खंडेराव कुलकर्णी) | १२–०० |
| ८) योगी अरविंद (लेखक– प्र. ग. सहस्रबुद्धे) | ३–०० |
| ९) चिंतन सामग्री | २–०० |
| १०) संघ आणि काळा कायदा | ०–५० |
| ११) दोन मुलाखती | १–०० |
| १२) संस्कृतीच्या मळवाटा (लेखक चं. प. भिशीकर) | १५–०० |
| १३) श्री. बाळासाहेब देवरस (धावती ओळख) | १–०० |
| १४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (लेखक–द. बा. ठेंगडी) | १–०० |

प्रकाशक : ब. शं. दाते,
भारतीय विचार साधना, १८४७ सदाशिव पेठ, पुणे ३०.
मुद्रक : म. द. कस्तुरे,
महाराष्ट्र मुद्रण शाळा, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ३०.